# कला, वाणिज्य व विज्ञानमहाविद्यालय पाटपन्हाळे

# वाणिज्य मंडळ

## वार्षिक अहवाल

## (२०१२-१३)

# Placement

BT
NEWS BROADCASTING

To,

The Principal,

Sub : Request for permission to conduct campus interview

Respected Sir,

We BT news broadcasting pvt Ltd, are recruiting and giving opportunity to fresher's in field of journalism. We are recruiting candidates for multiple positions of multi tasking job, including journalism, sales, Editing, Anchoring and many more.

We wish to conduct campus interviews at your institution, and to give opportunity to pass out students of your collage. We request you to let us conduct campus interview in your premises. We prefer graduates from any stream of education.

We would also like to let you know that; selected candidate has to undergo a paid workshop of BT institute of journalism and mass communication. Workshop will be covering all basics of journalism. So that he would be able to work properly with our organization.

Thanking you

Regards

13/04

Sachin Hatkar

Zonal Manager

BT News Broadcasting pvt ltd

Prof. Subham Khot,
For information and to manage campus interviews.


05/07/2012

B T News Broadcasting Pvt. Ltd. F/130, Dreams - The Mall, LBS Road, Bhandup (W) Mumbai - 400078 India
T : 022-65619143 | 022-21663052 | 022-21663053 E : contact@btnewbroadcasting.com

# कॅम्पस मुलाखतीचे आयोजन

दि. १६/०७/२०१२ रोजी बी.टी. न्यूज ब्रॉडकॉस्टींग या कंपनीतर्फे वरिल परिपत्रकाप्रमाणे कंपनीचे अधिकारी श्री. बापट तुकाराम यांनी महाविद्यालयामध्ये येऊन कॅम्पस इंटरव्ह्यू चे आयोजन केले होते. या मुलाखतीला महाविद्यालयातील २०११-१२ मध्ये पदवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बोलावण्यात आले होते. यातून ४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.






Campus Interview - Attendance list 16-07-12

B.T News Broadcasting

| Sr. No | Name of Student | Address | Sign |
|---|---|---|---|
| 1 | Shinde Mayur Yashvant | At post Kaundhar, Kalsur | [signature] |
| 2 | Shirkar Sanjay Chandrakant | At. Kajali, Post. Gimavi | [signature] |
| 3 | Charan Pratap mahipat | A/P Patpanhale | [signature] |
| 4 | Chavan Vishakha Deepak | A/P PatPanhale | [signature] |
| 5 | Mane Namita Narayan | A/P Pevé Khamshet | [signature] |
| 6 | Hadkar Pratibha Jayvant | A/P Shringartali | [signature] |
| 7 | Kadam RaJashri Jayvant | A/P PatPanhale | [signature] |
| 8 | Nair Savita Shrikumar | A/p. Shringartali | [signature] |
| 9 | Charan varsha vasant | A/P- ~~sho~~ Koundhar. Post. margatamane | [signature] |
| 10 | Kanase shilpa Dilip | A/P Chiveli Tal. chiplun | [signature] |
| 11 | more Dhanshree Rajun | A/P Shringartali | [signature] |
| 12 | Kadam Vaibhav Chandrakant | A/P- Chikhali | [signature] |
| 13 | Narvankar Vibhuti Latish | A/P. Shringartali | [signature] |
| 14 | | | |
| 15 | | | |

# मेणबत्ती तयार करण्याचे प्रशिक्षण

दि. १७ /०८/२०१२ रोजीमहाविद्यालयातील युवकांना छोटासा व्यवसाय करता यावा या हेतूनेमहिला व बालविकासशिक्षण व प्रशिक्षणसंस्थापुणे यांच्यावतीने मेणबत्ती तयार करण्याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षकम्हणूनमा.श्री.संतोष ध्वजकुमारगाठे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी मेणबत्ती तयार करण्यासंदर्भात सविस्तरअसेमार्गदर्शनकेले. तसेच त्याचे प्रात्यक्षिकही करूनदाखविले व या संदर्भात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांसमर्पकअशीउत्तरेदिली.





# कंपनी सचिव पदासाठी मार्गदर्शन


दि. ६ सप्टेंबर २०१२ रोजीकंपनीसचिव या क्षेत्रातील करिअर करण्यासाठी महाविद्यालयाचा माजीविद्यार्थी ज्याने कंपनीसचिवहीपरिक्षाउत्तीर्णकेलेली आहे, त्याचे या क्षेत्राशी संबंधीत सर्व घटकांवर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. यामध्ये जे विद्यार्थी करिअर करू इच्छितात त्यांना या मार्गदर्शनाचा उपयोग झाला.





# विद्यार्थी व युवकांमध्ये जनजागृती

दि. १ सप्टेंबरते १५ सप्टेंबर २०१२ या पंधरवाड्यात सामाजिक जबाबदारी लक्षात घेऊन किशोरवयीन मुली व युवतींच्या मनात स्वसुरक्षीततेची भावना व आत्मविश्वास निर्माण व्हावा या उद्देशाने तसेच महाविद्यायीन विद्यार्थी व युवकांनी कोणती गैरकृत्य केल्यास कोणते गुन्हे होऊ शकतात व करिअरवर त्याचे होणारे दुषपरिणाम गुहागर पोलिसस्टेशन व वाणिज्य मंडळ यांच्या संयुक्त उपक्रमाने २००० माहितीपत्रके तयार केली. रामपूर, आबलोली, अंजणवेल, पालशेत, दहिवली, खरवते, बोरगांव, पाटपन्हाळे या कनिष्ट महाविद्यालयात प्रत्यक्षात जाऊन तेथील विद्यार्थ्यांना प्रा. खोत, प्रा. गजभिये व प्रा. शिंधे यांनी मार्गदर्शन केले. तसेच तालुक्यातील सार्वजनिक ठिकाणी एकुण १० डिजिटल बोर्ड तयार करून लावले.



**महाविद्यालयीन विद्यार्थीनी व युवतींसाठी मार्गदर्शक सूचना**

किशोरवयीन मुली व युवतींच्या मनात स्वसुरक्षीततेची भावना व आत्मविश्वास निर्माण व्हावा या उद्देशाने पुढील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.


१. मुलींनी सार्वजनिक ठिकाणी जात असताना उत्तेजक अगर अंग दिसेल असे पारदर्शक कपडे वापरु नयेत.
२. आपल्या मोबाईल फोनवर अनोळखी व्यक्तीचा फोन आल्यास त्या व्यक्तीशी बोलण्याचे टाळावे. तसेच वारंवार त्रासदायक कॉल्स, एसएमएस, मिस्डकॉल येत असल्यास नजीकच्या पोलीस स्टेशनला कळवावे.
३. शाळा / कॉलेज सुटल्यावर कारणाशिवाय इकडे तिकडे न फिरता त्वरीत आपल्या घरी जावे. काही कामानिमित्त कुठे जावयाचे असल्यास त्याची माहिती घरच्यांना द्यावी.
४. कोणी व्यक्ती विनाकारण ओळख काढून बोलण्याचा प्रयत्न करु लागल्यास अशा व्यक्तींशी संवाद टाळावा.
५. स्वतःचा मोबाईल फोन क्रमांक आपल्या ओळखीच्या व्यक्ती, नातेवाईक व इतर आवश्यक व्यक्तीशिवाश इतरांकडे जाणार नाही याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन आपल्याला गैर मेसेजेस/गैर कॉल्स येणार नाहीत.
६. गाड्या, पैसे, आकर्षक वस्तू, मौल्यवान वस्तू वगैरे आमिषांना बळी पडू नये.
७. मित्रासोबत निर्जन, जंगल, झाडी अशा ठिकाणी गप्पा मारण्यासाठी जाऊ नये.
८. रात्रीचे वेळी घरापासून दूर जायचे असल्यास एकट्याने जाऊ नये.
९. आपले मित्र, मैत्रिणी यांची नावे, पत्ते फोन क्रमांक इत्यादींची माहिती आपल्या कुटुंबियांकडे द्यावी.
१०. पिकनिकला/सहलीला जात असताना आपले कुटुंबिय, वर्गशिक्षक यांना त्याची माहिती द्यावी.
११. सहलीसाठी गेल्यानंतर आपला ग्रुप सोडून एकट्याने जाणे टाळावे.
१२. इंटरनेटची परिपूर्ण माहिती असल्याखेरीज आपले फोटो त्यावर पाठवू नयेत.
१३. एखादी व्यक्ती/मित्र आपल्याला विनाकारण त्रास देत असेल अगर नको असलेल्या गोष्टींची भिड घालत असेल तर त्याची माहिती आपले कुटुंबिय, वर्ग शिक्षक यांना त्वरीत द्यावी.
१४. प्रवासी गाडीमध्ये शक्यतो आपल्या ओळखीच्या महिला, मैत्रिण, नातेवाईक यांचे जवळ बसून प्रवास करावा.
१५. तरुण मित्रांसोबत अश्लील विनोद, टिंगलटवाळी, वात्रट बोलणे तसेच त्यांच्याशी असभ्य वर्तन टाळावे.
१६. रात्रीचे वेळी शाळा, कॉलेज, नोकरीच्या ठिकाणचे ओळखपत्र नेहमी जवळ बाळगावे.
१७. अनोळखी व्यक्तीकडे पाहून हसणे, पुटपुटणे, विनोद करणे, हावभाव करणे अशा गोष्टी टाळाव्यात.
१८. आपली एखादी मैत्रिण अशाप्रकारे चुकीचे वागत असल्यास तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न करावा. तरी सुध्दा ती ऐकत नसलेस त्याची माहिती तिचे कुटुंबियांना द्यावी.

सौजन्य

वाणिज्य मंडळ
वरिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे

पोलीस निरीक्षक
गुहागर पोलीस ठाणे

\



**महाविद्यालयीन विद्यार्थी व युवकांना आवाहन**

आपल्या हातून खालीलप्रमाणे गैरकृत्य घडलेस आपल्या विरुध्द गुन्हा होऊ शकतो.

१. एखाद्या मुलीस तिच्या लज्जेस धक्का बसावा या इरादाने अपशब्द उच्चारणे, अंगविक्षेप करणे, अश्लिल चित्र, वस्तू दाखविणे, मुलीच्या मोबाईलवर अश्लिल एसएमएस, एमएमएस, इमेल पाठविणे असे कृत्य केल्यास भा.दं.वि.क. ५०९ प्रमाणे अपराध होतो. त्यास एक वर्ष कैद किंवा दंड किंवा दोन्ही होवू शकतात.
२. १८ वर्षे वयाचे आतील तरुणीशी एखाद्या सज्ञान तरुणाने विवाह केल्यास अशा तरुणास भारतीय बाल विवाह कायदा २००६ नुसार त्यास २ वर्षे कारावास किंवा १ लाख रुपये पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होवू शकतात आणि अशा अज्ञान मुलीस रिमांड होममध्ये पाठविले जावू शकते.
३. आपल्याकडून एखाद्या मुलीची जाणून बुजून छेडछाड उदा. हात धरणे, अपशब्द बोलणे यासारखे कृत्य होऊन एखाद्या मुलीचा विनयभंग झाला तर तो अपराध भा.दं.वि.क. ३५४ प्रमाणे गुन्हा होतो. सदर गुन्ह्यात २ वर्षे कैद किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षेची तरतूद आहे.
४. कोणत्याही प्रकारचे अमिष दाखवून, फूस लावून अगर फसवून एखाद्या तरुणीशी शारीरिक संबंध झाल्यास किंवा जवळीक साधल्यास भा.दं.वि.क. ३७६ प्रमाणे अपराध होतो. त्यास ७ वर्षे कैद व दंड किंवा जन्मठेप अथवा १० वर्षे कैदेची शिक्षा होवू शकते.
५. एखाद्या स्त्रीचे संमतीशिवाय तसेच १८ वर्षे वयाचे आतील तरुणीचे संमतीशिवाय किंवा संमतीनेसुध्दा एखाद्या तरुणाने शारीरिक संबंध केल्यास भा.दं.वि.क. ३७६ प्रमाणे अपराध होतो व त्यास जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद आहे.
६. एखाद्याचे हातून कोणत्याही कारणावरुन भांडण होवून त्यामध्ये कोणी जखमी/गंभीर जखमी झाल्यास तो भा.दं.वि.क. ३२४/३२५/३२६ प्रमाणे अपराध होतो. त्यास ३ वर्षे ते १० वर्षापर्यंत कैद व दंड किंवा दोन्ही शिक्षा होवू शकतात.

एखाद्या व्यक्तीकडून वरीलप्रमाणे एखादा अपराध घडून त्याचे विरुध्द पोलीस ठाणेस तक्रार दाखल झाल्यास त्यास खालील नमूद गोष्टींपासून वंचित रहावे लागणार आहे.

* आपणांस शिक्षणाकरीता किंवा नोकरीकरीता परदेशात जाणेकरीता पासपोर्ट, व्हीसा मिळणार नाही.
* आपणांस कोणत्याही शासकीय, निमशासकीय सेवेत नोकरी मिळणार नाही.
* आपणास एखाद्या कंपनीमध्ये नोकरीसाठी अगर अन्य कोणत्याही कारणाकरीता चांगले वर्तणूकीचा दाखला पोलीस ठाण्याकडून मिळणार नाही.
* आपणांस कोणत्याही निवडणूकीत उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही.

सौजन्य

वाणिज्य मंडळ
वरिष्ठ महाविद्यालय पाटपन्हाळे

पोलीस निरीक्षक
गुहागर पोलीस ठाणे













# एम.बी.ए. मार्गदर्शन

दि.१४/१२/२०१२ रोजी राजाराम शिंदे महाविद्यालय, पेढांबे येथील प्रा. एस. जी. किट्टे यांचे एम.बी.ए. मधील करिअर यावर मार्गर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर एम.बी.ए. मध्ये करिअर कशाप्रकारे चांगले करता येईल याचे तृतीय वर्ष वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.






# खाद्य महोत्सव (वर्षदुसरे)
## वाणिज्य मंडळाचा एक नाविन्यपुर्ण उपक्रम

बुधवार दि. ६ फेब्रूवारी २०१३ रोजी पाटपन्हाळे येथील महाविद्यालयाच्या प्रांगणात वाणिज्य शाखेच्या वाणिज्य मंडळातर्फे भव्य खाद्य महोत्सव साजरा करण्यात आला. हा या वर्षीचा सलग दुसरा उपक्रम होता. खाद्य महोत्सवाच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पाककृती कौशल्य, विपणन कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य व आदरातिथ्य कौशल्य वृध्दिंगत व्हावे यासाठी या खाद्य महोत्सवाचे आयोजनकेले. या कार्यक्रमात परिसरातील जनतेकरिता विद्यार्थ्यांनी बटाटा ब्रेडरोल, थालीपीठ, शेव ढोकळा, गाजर हलवा, फ्रूडसॅलॅड, उकडीचे मोदक, मेदू वडा, पोहाकटलेट (तिखट), गाजरपुरणपोळी, बासुंदी, चिकनभाकरी (चुलीवरील), कच्छीदाबेली, गुलाबजाम, चिकन बिर्याणी, मच्छी फ्राय, चिकन वडे, चिकनसँडविच, चिकनस्प्रिंगरोल इ. वस्तुंची मेजवानी दिली. या कार्यक्रमाच्या निमीत्ताने झी– २४ तास या दुरचित्रवानीने सदरमहोत्सवास भेट देऊन त्याचे सादरीकरण आपल्या चॅनलवर केले. तसेच मराठी चित्रपटसृष्टीतील जेष्ठ कलाकारमा. श्री अरूण नलावडे यांनी या महोत्सवास भेट देऊन विद्यार्थ्यांचेकौतूक केले. सदर कार्यक्रमामुळे महाविद्यालय व समाजात अधिकाधिक समन्वय वृध्दींगत होण्यास मदत झाल्याने संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. भालचंद्रजी चव्हाण यांनी प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.











KHATU


महाविद्यालय पाटपन्हाले















